स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतरविद्याशाखीय समाजकार्य विषयातील पीएच.डी पदवीसाठी
सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधन विषय

नांदेड जिल्हयातील आंध आदिवासी महिलांच्या सामाजिक—आर्थिक व आरोग्य विषयक स्थितीचा अभ्यास

संशोधक विद्यार्थी

मनोहर शामराव वागतकर

मार्गदर्शक

डॉ. अंबादास कर्डीले

सहाय्यक प्राध्यापक
जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र,
सिडको, नांदेड,

संशोधन केंद्र

जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र,
सिडको, नांदेड

नांदेड जिल्हातील आंध आदिवासी महिलांच्या सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक स्थितीचा अभ्यास

१) आंध आदिवासी समाजाची ओळख :

जगातील सर्वच देशात कमी अधिक प्रमाणात आदिवासी समाज आढळून येतोत्र जगाच्या तुलनेत भारतातील आदिवासींची लोकसंख्या लक्षणीय आहे. डोंगर, दऱ्या खोल्यामध्ये राहणारा हा समाज प्रगत समाजापासून अलिप्त आहे. भारताच्या चौफेर दिशांनी आदिवासी विखुरलेला आहे. त्यांना वेगवेगळ्या नावांनी संबोधले जाते. ठक्कर बाप्पा यांनी 'मुळ निवासी' डॉ. धुर्ये यांनी 'मागासलेले हिंदू' एलविन यांनी 'गिरीजन' तर भारतीय राज्यघटनेत 'अनुसूचित जमाती' असा उल्लेख आहे. आदिवासीमध्ये अनेक जाती, उपजातील आहेत. प्रत्येकाची जीवनपध्दती, मूल्य, श्रध्दा, आचार—विचार, प्रथा—परंपरा ठरलेली आहे. त्या त्या विशिष्ट भूप्रदेशातच ती जात मोठ्य प्रमाणात आढळून येते. **(आकरे २०१४:१)**

व्याख्या :

१) गिलीन व गिलीन यांच्या मते :

''आदिवासी समाज हा एक विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणारा. समान बोलीभाषा बोलणारा समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटाचे एकत्रिकरण आहे.''

२) डॉ. रिव्हर्स यांच्या मते :

''जमात किंवा आदिवासी हा एक सरळ, साधा सामाजिक समुह आहे, ज्यातील सदस्य एकसमान बोलीभाषेचा वापर करतात व युध्द इत्यादी सारख्या उद्देशपूर्ती करिता एकत्रित कार्य करतात.''

'आंध ही महाराष्ट्र राज्यातील एक प्रमुख आदिवासी जमात आहे. त्यांची वस्ती प्रामुख्याने परभणी (१०२९१६), नांदेड (९२६०८), यवतमाळ (१६०३३५), अकोला (८३६५५) या जिल्ह्यात आढळून येते. सन १९८१ च्या जनगणनेनूसार त्यांची एकूण संख्या (४७४११०) इतकी होती. आंध्र प्रदेशालगतच्या क्षेत्रातून येणाऱ्या तेलगू भाषीक लोकांचा आंध जमातीच्या लोकावर मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडला

आहे. आंध मराठी भाषा बोलतात, परंतू बोलण्याची शैली वेगळी आहे. आंध जमातीची आर्थिक परिस्थिती सामान्य असल्याचे घरे, झोपडपट्टी वजा कुडाच्या भिंतीवर सारवलेले असते आणि वर टिनपत्रे किंवा कौलारु असतात. काहींची घरे विटामातीची असतात, तर क्वचितच पक्की स्लॅबची आहेत. आंध जमातीच्या महिला मध्यम बांध्याच्या तसेच काळ्या सावळ्या वर्णाच्या असून लुगडे नेसतात व चोळी घालतात. नवीन पिढीतील मुली गोलसाडी (सहावार) आणि पोलखे (ब्लाऊज) घालतात. स्त्रिामध्ये गोंदण्याची पध्दत असून दागीनेही घालतात. महिलांच्या गर्भारपणाच्या अवस्थेत तिच्यावर बंधने असतात. पपई, आंबे, फणस खाऊ देत नाहीत. नाला ओलांडणे, स्मशानाजवळ जाणे, वजण ऊचलने उडी मारणे या गोष्टीवर बंधने असतात. परंपरेनुसार आंध जमातीत बालविवाह नव्हता. मुलगी वयात आल्यावर विवाह होता. एकाच कुळात विवाह केले जात नाहीत. **(डॉ. गारे २०००:१).**

आंध ही आंध्र प्रदेशातील आर्यतर जमात असल्याचे दिसते व त्यावरुनच त्यांना हे नाव पडले असावे. इसवी सनाच्या प्रारंभीच्या काळात पूर्व पश्चिम अशा दोन्हीही सागर किनाऱ्याच्या दरम्यान दक्षिण भारतभर आंध्र राजवंशाच्या अधिपत्याखाली बराच मोठा प्रदेश पसरलेला होता. अद्याप या प्रदेशातील बरेच लोक पैनगंगा नदी पलीकडील हैद्राबाद भागातून येतात. आप ही गोंड जमातची शाखा असल्याचे काहीचे मत आहे. आंध जमात स्वत:ला गोंड जमातीहून वेगळी व स्वतंत्र मानते. आंध जमात रंगाने काळी, ओठ जाड व गालाची हाडे वर आलेली या वैशिष्ट्यमूळे उठून दिसते. यामूळेच त्यांच्या ठिकाणी आदिवासींची ठळक लक्षणे दृ ष्टीस येतात, जमात दोन गटात विभागली आहे. ते म्हणजे वरताळी (खानदानी) आणि खालताळी (अनौरस) त्यांच्यात बर्हिविवाह संबंध करणाऱ्या पुष्कळ कुळी असून त्यांची नावे, गावाची नावे, जनावरे किंवा वनस्पतीची नावे यावरुन त्यांनी उचललेली दिसून येतात. जसे रिंगणी (एक प्रकारचे झाड), डुभोर (मुंग्याचे वारुळ), डुकरापासून दुकाटे, टिटवे (टिटवी एक पक्षी), वाघमारे (वाघ मारणारे) अशा प्रकारे त्यांनी वेगवेगळी नावे घेतलेली आहेत. **(कित्ता).**

आंध हे शेती व शिकार करणारे आदिवासी, ते डोंगराळ प्रदेशात राहतात, ते काळवीट, ससे, रानडुकरे व इतर पशु जाळ्यात पकडतात. त्यांचे मुख्य अन्न उत्पादने ज्वारी, तुर, उडीद, मुग, वाल ही आहेत. त्यांच्यात घरात परात, लोटा,

तांब्या, गंज, थाळी, गुंडी, तवा, वाटी, सुप, बास्केट, बादली, कंगी इत्यादी गृहउपयोगी साहित्य असते. **(कित्ता).**

एकाच कुळीच्या लोकांमध्ये आपसात तसेच चुलत मावस भावंडामध्ये विवाह निषिध्द मानला जातो. मात्र मुलीला आतेभावाशी लग्न करता येते. पूर्वीच्या काळी बालवयातच मुलीचे लग्न होत असत आणि त्यांच्या लग्नापूर्वीच त्यांचा वांग निश्चित होत असे. त्यांच्यातील लग्नविधी कुणबी समाजाप्रमाणेच होतात. ऑक्टोंबर ते डिसेंबर या दरम्यान सगाई होते आणि त्यानंतर तीन चार महिन्यांनी जानेवारीपासून एप्रिलपर्यंतच्या काळात लग्न समारंभ करण्यात येतो व वधु सज्ञान असेल, तर ती लगेच तिच्या पतीच्या घरी जाते. त्यांच्या बहुपत्नीत्त्वास मान्यता आहे, परंतू केवळ सुखवस्तु इसमच एकापेक्षा जास्त बायका करतो. त्यांना एकापेक्षा जास्त बायका असतात, ते श्रीमंत गणले जातात आणि त्यांना मानाने वागविण्यात येते. आते मामे भावंडामध्ये लग्न होऊ शकतात. मुलगी लग्नाआधीच गरोदर राहीली, तर ‘जातगंगा‘ त्या होऊ घातलेल्या बालकांच्या बापांना बोलावून त्याला त्या मुलीबरोबर लग्न करण्यास सांगते. काडीमोल व पूर्नरविवाह रुढी संमत आहेत. विधवांच्या पूर्नरविवास परवानगी आहे. विधवेला तिच्या पतीच्या भावासी किंवा त्याच्याच कुळातील इतर कोणत्याही इसमासी लग्न करता येत नाही. जर एखादी अविवाहीत मुलगी तिच्या जातीतील किंवा वरिष्ठ जातीतील एखाद्या इसमापासून गरोदर राहीली, तर तिला दंड करण्यात येतो आणि नंतर तिला विधवेप्रमाणे लग्न करावे लागते. लग्न समारंभाचे वेळी इतर मुलीप्रमाणे तिची पायपाखळणी (पाय धुण्याचा विधी) केल्या जात नाही किंवा त्यांना आळताही लावला जात नाही. काही ठिकाणी एखाद्या स्त्रीने परपुरुषाबरोबर किंवा कनिष्ठ जमातीच्या पुरुषाबरोबर अनैतिक संबंध ठेवल्यामूळे तिची जाती भ्रष्ट झाल्यानंतरही जात पंचायतीने तिला पुरुषासह पून्हा जातगंगेत घेतल्याचे आढळून येते. जात कर्माबद्दल दोषी ठरलेल्या स्त्रीला तिच्या ऐपतीप्रमाणे दंड ठोठावण्यात येतो आणि जात जेवण घालावे लागते असे प्रकार उघडकीस आणणे व शिक्षा देणे या गाष्टीबद्दल व्यक्तीशः प्रत्येकाला आस्था असते. **(कित्ता)**

आंध जमात शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेली आदिवासी जमात म्हणून ओळखली जाते. गेल्या पन्नास वर्षात या जमातीने बरीच प्रगती केलेली आहे, त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण १८.५५ एवढे आहे. आंध जमात ही शेतीप्रधान आहे. भूमीहिन मजूराचे प्रमाण तुलनात्मक त्यांच्यात कमी आढळते. शेती विकासासाठी विकास

योजनांचा फायदा या जमातीने चांगल्या प्रकारे करुन घेतला आहे **(कित्ता)**.

भारतातील आदिवासी :

आदिवासी जमात ही जगाच्या बहूतेक सर्वच भागात आहे. विशेषत: आशिया, आफ्रिका, अमेरिका खंडामधील देशामध्ये आजही आदिवासी मोठ्य संख्येने आढळतात. युरोपमध्ये त्याचे फार झपाटयाने आधुनिकीकरण झाल्याने आज युरोपमध्ये आदिवासी जमात म्हणून ओळखणे कठीण झाले आहे. भारतात आदिवासी जमात ही मोठ्य संख्येने असून त्या संपूर्ण भारतभर पसरलेल्या आहेत, त्यांची संख्या एकूण ४१४ आहे. आदिवासी समाजाच्या अभ्यासासाठी अनेक अभ्यासकांनी, प्रशासकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठे योगदान दिले आहे, त्यात पाश्चिमात्य विचारवंत सेडविक रिसने, ए.व्ही. ठक्कर, सुबरन, मॉर्टिन ब्रिक्सन, एल्विन इत्यादी संशोधकांनी संशोधन करुन आदिवासी जीवन व त्यांचे आंतररंग यांचा सखोल अभ्यास केला आहे. **(वागडव २०१२:१)**.

हंटन या विचारवंताने या जंगली टोळ्यांना आदिम अगर आदिवासी हे नाव दिले आहे, तर भारतीय सामाजिक विचारवंत डॉ. पुर्वे यांनी तथाकथित मूळचे रहिवाशी व मागासलेले हिंदू असे म्हटलेले आहे. भारतीय संविधानात या जंगली डोळनांना अनुसूचित जमाती असे संबोधले आहे. तसेच आदिवासींना वनवासी व गिरीजन हा शब्दप्रयोग केला आहे. परंतू आदिवासी हे या देशातील मूळचे रहिवाशी आहेत म्हणून त्यांना वनवासी किंवा गिरीजन म्हणने योग्य नाही, ते या देशातील मूळ निवासी आहेत. भारतीय संविधानात आदिवासींना अनुसूचित जमाती असे संबोधले आहे. भारतीय संविधानातील कलम ३४२ (१) नुसार राष्ट्रपतींना कोणत्याही राज्याच्या संघ क्षेत्राच्या बाबतीत आणि ते राज्य असेल, तर त्यांच्या राज्यपालाचा विचार घेतल्यानंतर जाहीर अधिसूचनेद्वारे त्या राज्यात किंवा जनजातीय समाजांचे भाग किंवा गट निर्देशित करता येतील **(कित्ता)**

आदिवासी महिलांचे सामाजिक स्थान :

समाजात मिळणारे हक्क, कर्तव्य, सवलती यावर स्त्रींयाचा सामाजिक दर्जा अवलंबून असतो. त्यांच्या जमातीत जन्मापासून ते मृत्यूपर्यंत स्वी कोणत्या ना कोणत्या भूमिका करते. हे पाहीले की, त्याचे सामाजिक दर्जाची कल्पना येते. स्त्रीयांचे कुटूंबातील व समाजातील स्थान हा विषय विकासासाठी आखल्या जाणाऱ्या योजनांमध्ये प्रामुख्याने असतो. विकास साधनांची उपलब्धता किंवा त्यापासून होणारा

लाभ पुरुषांच्या तुलनेत स्त्रीयांना कमी होत असतो. स्त्रीयांना कुटूंबात व समाजात विविध काही जे स्थान असते. त्या स्त्रीयांचे वय, वैवाहिक स्थिती, गुणवत्ता, व्यवसाय, सामाजिक स्थिती, इत्यादी घटनाचा स्त्रीयांच्या सामाजिक स्थितीवर परिणाम होतो. मराठवाड्यतील आदिवासी महिलांना मिळणारी प्रत्यक्ष वागणूक कायदेशीर दर्जा, सार्वजनिक कामाची संधी, कामाचे स्वरुप व व्याप्ती या चारही घटकावर दर्जा ठरवणारे निर्धारक आहेत. **(वागडव २०१२:१).**

आदिवासी स्त्रीयांच्या सामाजिक दर्जाबाबत अध्ययन करत असताना वारस हक्काविषयी निर्णय स्वतंत्रपणे घेण्या बाबत त्याच्या नौकरी व व्यवसाय बाबत आणि मुलींच्या शिक्षणाबाबत त्या स्त्रीयांची स्थिती व त्यांची मानसिकता अभ्यासणे खुप गरजेचे आहे. कुटूंबाचा वारस म्हणून त्या स्त्रीकडे पाहीले जाते काय? विधवेने पून्हा लग्न करेपर्यंत तिच्या त्या मिळकतीवर हक्क असतो का? तिने लग्न केल्यावर तिच्या मुलीला किंवा मुलाला ती मिळकत मिळते का? बहूतेक वेळा स्त्री आपल्या मुलाला सासरी ठेवते का? आणि त्यामूळे सासरच्या संपत्तीवर व घरावर त्याचा हक्क राहतो का? या स्वीयांच्या दृष्टिने असे करणे फायदेशीर असते का, दुसरा पती व पहिल्या मुलाला त्यांच्या संपत्तीचा वारस मानेल असे होवू शकते का? याचेही अध्ययन करणे खुप महत्त्वाचे आहे **(कित्ता).**

आदिवासी महिलांचे कुटूंबातील स्थान :

आदिवासी महिला विशेषत: सुन सर्वात अगोदर उठणे, धान्य दळणे, पाणी भरणे, साफसफाई, जेवणाची तयारी करणे, कपडे धुणे ही सर्वत्र आढळणारी कामे करते. अन्नधान्य तुटवड्यच्या काळात दुसऱ्यांच्या शेतावर जाणे, मजूरी करून कुटूंबाचा उदरनिर्वाह चालविते, तसेच ती शेती हंगाम संपल्यावर रोजगार हमीचे कामे, गवत कापणे, डिंक संकलन, टेंबरीचे पाने आणने, लाकडे आणने, इत्यादीमध्ये पुरुषांना मदत करणे अशी कामे आदिवासी महिला करताना दिसतात. महिलांचे सामाजिक स्थान निश्चित करत असताना व समजून घेत असताना नेहमी दुसऱ्याच्या तुलनेत एखाद्या व्यक्तीचा प्रमाण भूमिकांशी निगडीत असतो. आज आदिवासी महिलांच्या आयुष्यात पारंपारिक, आधुनिक, विचार एकत्र आलेले दिसतात. अशा गुंतागुंतीच परिस्थितीत महिलांच्या शारीरिक व सामाजिक विकास प्रक्रियेत तिच्या विविध भूमिका पार पाडते. त्यांचे व्यवस्थित विवेचन व अध्ययन करणे गरजेचे आहे. **(वागडव २०१२).**

मुलींना वर निवडण्याचे स्वातंर्त्य असते का? पुरुषाशीच अनैतिक संबंध हिन समजले जातात का? न्यायनिवाडा कामात पंचायतीत फक्त पुरुषांनाच संधी असते का? स्त्रीयांना पण असते, स्त्रीयांसाठी ऋतमती काळात शेतातील धान्य, खळ्यात प्रवेश दिला जातो का, त्या धंद्याला स्पर्श झाला, तर पुढच्या वर्षी पीक कमी येते अशा आजच्याही काळात आदिवासीमध्ये समाज आहे का? तसेच सर्वच धार्मिक विधीत निश्चितता आहे का? कटुमनी विभागली गेले आहेत का, एक पुरुष कमी होणारा असल्यामूळे स्वतंतपणे नौकरी करण्याचे, व्यवसाय करण्याचे आवश्यकता आहे किंवा नाही, विवाहात सुध्दा वर मूल्यांची पध्दत प्रचलीत आहे का? यावरील सर्व बाबीचे अध्ययन करणे अगत्याचे आहे **(कित्ता).**

आंध आदिवासी जमात :

आंध द्रविडीयन वंशाची जमात आहे असे रसेल आणि हिरालाल यांचे मत आहे. आंध जमातीत उपजाती, पोटजाती नाहीत, मात्र आंध जमात दोन गटात विभागली आहे, ते म्हणजे वरताळी आणि खालताळी या दोन गटात पूर्वीपासून रोटी व्यवहार होतात, परंतू बेटी व्यवहार होत नव्हते ते अलीकडे होत आहेत. आंध जमातीचे लोक परस्परांना रक्तसंबंधाचे भावबंध मानतात, ते त्याला भावकी असे म्हणतात. त्यांची उत्पती एकाच पूर्वजापासून झाली असा त्यांचा दृर विश्वास आहे. या दृढ विश्वासामूळे त्यांच्यात विलक्षण सामाजिक बांधीलकी, प्रेम, आपुलकी व सहकार्य, कुटूंबात निर्माण झालेले दिसते. आधी जमात पैनगंगा नदीच्या खोऱ्यात मर्यादित भौगोलीक प्रदेशात राहते, त्यांच्या वस्तीस्थानाचे क्षेत्र इतर प्रगत समाजापासून दूर डोंगर दऱ्यात व जंगलात आहे. पैनगंगा नंदी बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतामाळ, हिंगोली, परभणी, नांदेड, आदिलाबाद, तेलंगाणा या जिल्ह्यातून वाहत जाते, ते वर्धा नदीला जावून मिळते. **(धुमाळे २०१६:१).**

धुभा आंध समाजाचे जीवन राहाटी इतर समाजाहून निराळे आहे. त्यांचे सामाजिक संबंध, रक्तसंबंधावर आणि कुळ समानतेवर आधारलेले आहेत. त्यांच्यात व्यक्तीव्यक्तीचे परस्पर संबंध करारात्मक नाहीत. आप्तसंबंधांना त्यांच्या जीवनात महत्त्वपूर्ण स्थान आहे, परंतू त्यांच्यातील जमात पंचायत पूर्वीसारखे प्रभावी राहीलेले नाही. त्यांचे रितीरिवाज रुढीपरंपरा, धर्मश्रध्दा इत्यादी नेत्यांचे सामाजिक जीवन नियंत्रित झाल्याचे दिसते. या जमातीला पोट जमाती नसल्यामूळे त्यांचे समान सामाजिक व सांस्कृतिक जीवन आढळून येते. समान सामाजिक आणि सांस्कृतिक

जीवनामूळे त्यांचे खानेपिणे, आचार विचार, केसभुषा, वेशभुषा व एकूणच जीवनाविषयक दृष्टिकोन यामध्ये पैनगंगा नदीच्या मर्यादित भौगोलीक प्रदेशात समानता आढळून येते आणि सामाजिक एक्यभाव त्यांच्यात क्षणोक्षणी दिसून येतो. **(कित्ता)**

आंध जमातीच्या अर्थव्यवस्थेचे ध्येय फायदा मिळवणे नसून त्या ऐवजी एकमेकांना मदत करणे ही प्रवृत्ती त्यांच्यात विशेषत्वाने आढळते. अलीकडे प्रगती साधन्यासाठी परस्परात चढाओढ सुरु झाली आहे. आध जमात ही निसर्गशक्तीचा अधिक वापर करुन घेण्यासाठी स्वत: च्या परिश्रमावर अधिक विसंबलेली आहे. पारंपारिक पध्दतीने मासे पकडण्याची जाळी, शिकारीची आयुधे, जनावरांचे शेळ्या मेंढ्यंचे संरक्षण करण्याच्या जागा, शेती औजारे, हत्यारे, धान्य साठवण्याचे साधने व दैनंदिन उपयोगाच्या व इतर वस्तूचे उत्पादन आंध जमातीचे लोक स्वत: करतात. आंध आदिवासी लोक निसर्गातील प्राणी पक्षी व वनस्पतीचे मनोभावे पुजा करतात. हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, अति मानवी शक्तीला संतुष्ट करण्यासाठी आंध जमात पूर्वजपुजा, भुतपुजा, देवपुजा व निसर्गपुजा करतात. अति मानवी शक्तींना आपलेसे करून घेण्याचे काम या जमातीत भक्ताकडून जादूटोणा, मंत्र, तंत्र इत्यादीच्या साह्याने केले जाते आणि जमातीचे प्रमुख लक्षण म्हण्णजे एकजन्सीपणा आहे. आंध जमात आंतरविवाही आहे व तिचे बहिर्विवाही कुळीत विभाजन झालेले आहे. आज जमातीत स्वतंत्र जमात पंचायत आहे. तिच्या प्रमुखाला म्हेर्त्या म्हणतात, परंतू आज ती फारशी प्रभावी राहीलेली नाही **(कित्ता)**.

आंध आदिवासी असलेले नांदेड जिल्हयातील तालुकानिहाय गावाची नावे :

आंध आदिवासी जमात ही प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा आणि तेलंगनात आढळून येते. आंधाची गावे ही डोंगरमाथ्यावर, दऱ्याखोच्यात अधिकतर दिसून येतात. त्यांचे वास्तव्य असलेल्या काही गावाची नावे तालुकानिहाय पुढीलप्रमाणे

१) हदगांव तालुका :

कुसळवाडी, विठ्ठलवाडी, ठाकरवाडी, वारकवाडी, धन्याचीवाडी, डाक्याचीवाडी, तळयाचीवाडी, गवतवाडी, राळावाडी. देशमुखवाडी, रानवाडी, जंगमवाडी, खरबी, तरोडा, मनाठा, चोरंबा (खुर्द), चोरंबा (बु.) सावरगाव, माळझरा, कार्ला, जांभळा, केदारनाथ, चिंचगव्हाण, निमटोक, कोंदूर, हाळेगाव (माळेगाव),

रामबापुनगर, माळंगी, सोनाळा, नाव्हा, हनुमाननगर, रावणगाव, गायतोंड, जांभळसावली, गारगोटी, कवाना, सुकळी, लोहा **(धुमाळे २०१६:१)**.

२) किनवट तालुका :

वागदरी, हिंगणवाडी, सोनवाडी, लोखंडवाडी, झळकवाडी, शृंगारवाडी, डोंगरवाडी, ठाकरवाडी, नखातेवाडी, तळ्याची वाडी, गोकुंदा, प्रधानसांगवी, मदनापुर, शनिवारपेठ, चिखली (खुर्द), आंधबोरी, दहेगाव, इजेगाव, पिंपळफोडी, बोधडी, थारा, दिग्रस, धानोरा, कोलारी, सावरगाव, जलधारा, रिटा, इरेगाव, नंदगाव, इस्लामपुर, कोसमेट, कुपटी, कुपटी (बु.), सोनपेठ, सांगवी, तल्लारी, शिवनी, शिवणगाव, आप्पाराव पेठ, मोरगाव, राजगड, कनकवाडी, अंजी, माळबोरगाव, मोहपुर, मुळझरा, मांजरी, मांजरीमाथा, माळकोल्हारी, होडी, झिंगारवाडी **(कित्ता)**.

३) माहूर तालुका :

रुई. हडसनी, गुडवन, कुपटी, दहेगाव, अधिमाळ, पाचुंदा, भिमपुर, डिंगळी, साकुर, तांदळा, येवळेश्वर, वानोळा, खेडी, पानोळा, मुंगशी, वामपणी, पवनाळा (वरचा), पवनाळा (खालचा), मेंधळी **(कित्ता)**.

४) भोकर तालुका :

बोरवाडी, गारगोटवाडी, साळावाडी, समंदरवाडी, ताटकळवाडी, झिंगरवाडी, आंधवाडी, आमदरी, वागद, नारवट, पांडूरणा, खरबी, डोरली, नवीन आमदरी **(कित्ता)**.

५) हिमायतनगर तालुका :

दगडवाडी, ताडाचीवाडी, वडाचीवाडी, वायवाडी, गणेशवाडी, भिश्याचीवाडी, बंदुक्याचीवाडी, घरसवाडी, वाळक्याचीवाडी, बुरकुलवाडी, कोठावाडी, वाशी, एकपरी, दाबदरी माधापुर, शिरचोंडी, पिरचोंडी, पोटा, एकांबा, वडाचा दरा, दरेगाव, वडगाव, जुना पानदरा **(कित्ता)**.

६) मुदखेड तालुका :

तिरकसवाडी (अंधवाडी)

७) अर्धापुर तालुका :

पाटनुर, चेनापुर, लहान, आंबेगाव, आबादी **(कित्ता)**

आंध आदिवासी विकासाचे दृष्टिकोन :

आदिवासी समाजात आर्थिक, सामाजिक, आरोग्य विषयक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक अशा अनेक प्रकारच्या समस्या आहेत. या समस्येनी आदिवासी समाज बऱ्याच प्रमाणात ग्रासलेला आहेत्र काही समस्या प्रगत समाजाच्या संपर्काने निर्माण झालेल्या आहेतत्र प्रगत समाजच्या संपर्काने सांस्कृतिक, आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत. या सर्व समस्याचे निराकरण करुन या समाजाच्या विकासासाठी विकास विषयक योजना निर्माण कुरुन त्या राबविण्याची जबाबदारी गैर—आदिवासीची, प्रगत समाजाची आहे. आदिवासी समाजासाठी कशा पध्दतीने विकास योजना तयार कराव्यात आणि त्या कशा पध्दतीने राबविण्यात यासंदर्भत वेगवेगळ्या अभ्यासकांनी विचार दृष्टीकोन सांगितलेले आहेत. **(घायाळ २०११:१)**

प्रमुख तिन दृष्टीकोन सांगितलेले आहेत.

१) अलिप्तवादी दृष्टीकोन :

आदिवासी समाजाच्या विकासाच्या अलिप्तवादी दृष्टीकोनाचे समर्थक, डॉ. व्हेरीअर एल्विन हे आहेत. त्यांनी त्यांच्या 'Loss of Nerye' या ग्रंथात आदिवासीच्या विकासाचा दृष्टीकोन मांडलेला आहे. या दृष्टीकोनानुसार आदिवासी समाज हा पूर्वीपासून इतर समाजापासून दूर, स्वातंर्त्य वेगळे जिवन जगत आलेला आहे. त्यांची संस्कृती वेगळी आहे. आदिवासी समाजाची संस्कृती टिकवून ठेवायची असेल तर त्यांना प्रगत समाजापासून दूर ठेवले पाहिजे. कारण प्रगत समाजामुळेच आदिवासी समाजामध्ये समस्या निर्माण झाल्या आहेत. आदिवासीची वेगळी जिवन पध्दती प्रगत समाजाच्या संपर्काने नष्ट होऊ नये. म्हणून त्यांना प्रगत समाजापासून अलिप्त ठेवले पाहिजे. यालाच आदिवासी विकासाचा अलिप्ततावादी दृष्टीकोन असे म्हणतात. **(कित्ता)**

डॉ. एल्विन म्हणतात की, आदिवासीचा गैर आदिवासीशी येणारा संपर्क बंद केला पाहिजे. आदिवासी करिता स्वतंर्त्य विभाग स्थापन करुन त्या विभागात इतरांनी ठवळाठवढ करु नये. यालाच डॉ. एल्विन यांनी 'राष्ट्रीय उद्यान' असे म्हटले आहे. राष्ट्रीय उद्यानात गोंड, बैगा इत्यादी जमाती मुक्तपणे जिवन जगु शकतील. त्यांची

संस्कृती, साहित्य, भाषा, प्रथा, परंपरा, टिकून राहतील. आदिवासी समाजात बदल संथ गतीने घडवून आणयचा आहे. प्रगत समाजाच्या संपर्काने अनिष्ठ प्रथाचा शिरकाव झाले आहे. उदा. गुप्तरोग, देशी व विदेशी मद्य प्राशन करणे, धार्मिक आक्रमण, भाषिक आक्रमण, वेठबिगारी इत्यादी या विविध समस्यामुळे आदिवासी समाजाल जिवन जगण्यास अडथळा निर्माण होत आहे. आदिवासी समाजामध्ये काही बाबीचे जतन करणे गरजेचे असते. मनोरंजनाचे प्रकार, दागदागिने, कलाकुसर, भरतकाम, विणकाम, त्यांच्यातील प्रामाणिकपणा, वैध्याव्यवसायाचा अभाव, स्त्रियांचा उच्च दर्जा, पत्नीचा उच्च दर्जा, युवाग्रह इ. बाबीचे संरक्षण करण्यासाठी प्रगत समाजापासून दूर ठेवले पाहिजे. आदिवासींना प्रगत समाजापासून दूर ठेवले पाहिजे. त्यांच्यासाठी राष्ट्रीय उद्यानाची कल्पना ते मांडतात. **(कित्ता)**

२) सामिलीकरण दृष्टीकोन (विलीनिकरणवादी दृष्टीकोन) :

आदिवासी विकासाच्या सामिलीकरण त्या दृष्टीकोनाचे समर्थन डॉ. धुर्य व ठक्करबाबप्पा हे आहेत. हा दृष्टीकोन अलिप्ततावादी दृष्टीकोनाच्या विरुध्दाचा दृ ष्टीकोन आहे. हा दृष्टीकोन सांगते. आदिवासी समाजाचा विकास हा आदिवासींना इतर समाजपासून दूर ठेवल्याने होणार नाही. आदिवासी समाजाच्या अवधीभोवती असणाऱ्या नागरी समाजाशी विलीनीकरण घडवून आणले पाहिजे. आदिवासी समाजाचे प्रश्न, जिवनपध्दती, संस्कृती यांच्या आधारे न सोडवता इतर समाजाशी एकरुपता निर्माण करुन सोडवले पाहिजेत.**(कित्ता)**

आदिवासीच्या विकासासाठी अलिप्ततावद ही एक भयंकर उपाययोजना आहे. तसेच केल्यास राष्ट्रीय एक्याला बाधा पोहचेल. आदिवासी समाजाला अलिप्त ठेवले तर आदिवासीचा विकास होण्याऐवजी त्याचे प्रश्नवाढतील व आर्थिकदृष्ट्य दुर्लक्ष होऊन त्यांच्या दारिर्द्यात वाढ होईल. देशातील गैरआदिवासींना सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, क्षेत्रात हक्क व अधिकार मिळाले आहेत. तसेच अधिकार समानतेच्या आधारावर आदिवासी समाजाल सुध्दा मिळाले पाहिजे. डॉ. धुर्ये म्हणतात की, आदिवासी हे मागासलेले हिंदुच आहेत. हिंदु समाजातील कनि९ष्ठ जातीत ज्या प्रथा आढळून येतात त्याच प्रथा आदिवासी जमातीत आढळून येतात. सामाजिक संघटन, विवाहप्रथा, धार्मिक रितीरिवाज आचार—विचार हिंदुच्या समजिक संघटन, विवाह, धार्मिक, रितीरिवाजांशी मिळते जुळते आहेत. त्याशिवाय, जातीयता, अस्पृश्यता स्त्रीचा कनिष्ठ दर्जा या समस्या कमी होत आहेत. आदिवासी समाजाचे

हिंदु लोकांशी सामिलीकरण झाल्यास त्याच्यावर अन्याय होणार नाही व त्यांचा विकास होईल. **(कित्ता)**

आदिवासी समाजावर काही प्रगत लोकांमुळे किंवा ब्रिटीशांच्या राज्यामुळे अनिष्ठ परिणाम झाले आहेत. हे अनिष्ठ परिणाम फक्त आदिवासी समाजावरच झाले नाहीत. तर बिगर आदिवासी समाजारही त्यांचे दुष्परिणाम झाले आहेत. उदा. वेठबिगारी पध्दत, जमिनीचे हस्तांतरण, भुदास पध्दती, या बाबी गैर आदिवासी समाजातही आढळतात. डॉ. धुर्य म्हणतात, आदिवासीचे गैरआदिवासीचे अनेक बाबी संदर्भात आदान—प्रदान प्राचीन काळापासून घडत आलेले आहेत. **(कित्ता)**

थोडक्यात आदिवासींचा विकासाचा सामिलीकरण हाच एकमेव मार्ग आहे. त्याच मार्गाने आदिवासीचा विकास होऊ शकतो.

३) एकीकरणवादी दृष्टीकोन :

एकीकरणवादी दृष्टीकोन डॉ. हटन यांनी मांडलेला आहे. आदिवासी समाजाचा विकास हा एकीकरणाच्या माध्यमातून केला पाहिजे. त्यांना वाटते अलिप्तावादी धोरणाने आदिम समाज हा प्रवाहापासून दूर जाऊ शकतो. तर सामिलीकरणाने आदिवासीची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती नष्ट होऊ शकते. भारतीय जिवनाशी आदिवासीचे एकत्व साधतांना त्याची वैशिष्ट्पूर्ण जिवन पध्दती कायम राहिली पाहिजे. आदिवासीची संस्कृती जतन करण्यासाठी त्यांना संरक्षण दिले पाहिजे. डॉ. हटन यांनी आदिवासी समाजाचा प्रगत समाजाशी संबंध आल्यामुळे आदिवासी जिवनात बदल झाले आहेत. जंगल कायद्यांनी निर्माण केलेले निर्बंध, जकात कायदे, जमिनीचे हस्तांतरण, स्थानांतरित शेतीतील बदल इत्यादीमुळै आदिवासी जिवनात तडे गेले आहेत. त्यामुळे आदिवासी समाजाचे विघटन थांबावायचे असेल तर त्यांना संरक्षण दिल्याशिवाय पर्याय नाही. **(कित्ता)**

डॉ हटन म्हणतात आदिवासीचा विकास करण्यासठी एकीकरणाच्या धोरणाप्रमाणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यांच्यापर्यंत प्रगत समाजातील सांयी—सवलती पोहचविल्या पाहिजेत. त्यांना शैक्षणिक सोयी, तंत्रज्ञानाचा विकास, वैद्यकीय सोयी व दुर्गम भागात राहत असल्यामुळे रस्ते, दळणवळणाच्यासोयी, शिक्षण इत्यादी सुविधा पोहचविणे व त्यांचे महत्व त्यांना पटवून देणे. भारतातील आदिवासीच्या विकासासाठी हा एकात्मवादी दृष्टीकोन अधिक योग्य वाटतो. भारतीय

शासनानेही आदिवासीच्या विकासासाठी हाच दृष्टीकोन स्विकारलेला असून आदिवासीसाठी अनेक योजना आखून त्याची अंमलबजावणी केली जात आहे. **(कित्ता)**

२) संदर्भ साहित्याचा आढावा

१. सावरा मिरा (१९८८)[१]

यांनी आदिवासी स्त्रीयांच्या समस्या व संघर्ष या लेखात वसाहतीकरणामुळे आदिवासीच्या जीवनात झालेल्या बदलाचा काय परिणाम झाला ते विषद केले. आदिवासी स्वी स्वतंत्र असल्याने कुटूंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी स्त्रीला उचलावी लागते. झाडे तोडणे, शिकार करणे ही कामे पुरुषाकडे, तर शेतीची कामे स्वीया करत. पूर्वापार चालत आलेली कामाची वाटणी आजही जशाच्या तशाच आहेत असा उल्लेख केला आहे..

२. डॉ. माधव बंडू मोरे (२०२२)[२]

आदिवासी बोलू लागला या पुस्तकात आदिवासी जमातीविषयी पुढील विचार व्यक्त केले निसर्गातील तत्त्वे, नियम, जीवनसृष्टीशी – संबंध यातून या समाजाचे स्वत:चे जीवनमूल्ये सामाजिक व सांस्कृतिक संबंध निश्चित केले व अनैसर्गीक भेदभावाच्या वातावरणातून अलिप्त राहीला, परंतू त्याला जे वाटले ते करता आले नाही, असाह्यतेमूळे अडचणी निर्माण झाल्या व यामूळेच तो मागास राहीला आहे.

३. कोकाटे चंद्रकात (२००८)[३]

हिंगोली जिल्हयातील आदिवासी समाजाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन या पीएच. डी. शोध प्रबंधात आदिवासीमध्ये अंध: श्रध्देचे मूळ त्यांच्या निरक्षरतेत आहे. आदिवासीमधील असलेले दारिर्द्य, निरक्षरता, अज्ञान तसेच आदिवासी भागात असलेल्या आरोग्य सुविधांचा अभाव यामूळे कुपोषणासारखी समस्या दिसून येते.

४. धनजकर राजेश (२०१०)[४]

मराठवाड्यतील अंध जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास या प्रबंधामध्ये मराठवाड्यतील प्रमुख आंध जमातीच्या आर्थिक जीवनाच्या अभ्यासामध्ये त्याच्या आर्थिक परिस्थिती हलाखीच्या असून त्याचे उपजीवीकेचे साधन म्हणजे अल्प शेतीचे क्षेत्र आणि मजूरी हे होय. सद्या आंध समाजाकडे जी जमीन आहे ती डोंगरमाथ्यावर,

दऱ्याखोऱ्यात, खडकाळ व हलक्या प्रतीची आहे. मराठवाड्यतील बहूतांश आंध लोक भूमीहिन आहेत.

३) समस्या सुत्रण :

कोणत्याही शास्वीय अध्ययनाला सुरुवात करण्यापूर्वी अध्ययनाकरिता एखाद्या समस्येची निवड करावी लागते. समस्या सुत्रण ही शास्त्रीय संशोधनाची पहिली पायरी होय. प्रथम अभ्यासाचे क्षेत्र आणि नंतर अध्ययनाची समस्या निश्चित केली जाते. त्यानूषंगाने प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधनाकरिता नांदेड जिल्हा हे क्षेत्र निश्चित करण्यात आले. असून आंध आदिवासी महिलांचा सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

४) संशोधन विषयाची निवड

संशोधनकर्त्याला सुरुवात करण्यासाठी संशोधकाला संशोधन विषयाची निवड करणे आवश्यक असते, त्यामूळे संशोधनाला एक निश्चित दिशा प्राप्त होते. सामाजिक शास्त्रामध्ये विषय निश्चितीला समस्यामुप्रण असे म्हणतात. विषयाची निवड सहजपणे होत नाही, तर संशोधकाला एखाद्या घटनेची कारणमिमांसा निर्माण झाल्यानंतर तो संशोधनविषयाची निश्चिती करतो. नांदेड जिल्हातील आंध आदिवासी महिलांचे सामाजिक स्थिती खालावलेली आहे. त्याचबरोबर शिक्षणाचे प्रमाण कमी आहे, आर्थिक त्यामूळे आंध आदिवासी अंधश्रध्देला बळी पडल्याचे प्रकार दिसून येतात, त्यामुळे त्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्याचे स्थिती अभ्यासण्याच्या उद्देशाने संशोधन विषयाची निवड करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आंध आदिवासी महिलांचे सामाजिक आर्थिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषय संशोधना करिता निवडण्यात आला आहे..

५) संशोधन विषयाचे महत्त्व :

भारतातील जाती व्यवस्थेचे इतर जातीच्या तुलनेत आदिवासी समाजातील महिला यांची प्रगती पाहिजे त्या प्रमाणात झालेली नाही. महाराष्ट्राच्या इतर विभागापेक्षा मराठवाडा विभागातील विभागामध्ये नांदेड जिल्ह्यातील आंध आदिवासी समाज हा जास्त मागासलेला आहे. हा समाज कष्टाळू, प्रामाणिक व सरळमार्गी असल्यामूळे स्वत:च्या सुधारणेसाठी आक्रमक संघर्षात्मक स्वरुपाची भूमिका घेत नाही. स्वातंर्त्य मिळून ꣸ꣵ वर्षे झाल्यानंतरही या समाजाची घरे डोंगरदऱ्यात वाडयापाडयाची

आहेत. दगडमातीची, कुडाची कच्ची घरे आहेत. या जमातीमधील स्त्रीया शेतमजूरी. जंगलसंपत्तीच्या कामातून आपला उदरनिर्वाह करतात. त्यांच्याकडे असलेली शेती हलक्या प्रतीची असून पारंपारीक पध्दतीने शेती करतात. त्यामूळे आदिवासी समाजातील स्त्रीया आज मोठ्य प्रमाणात दारिद्र्यात जीवन जगताना दिसतात. त्यांचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आरोग्यवर झाला आहे व त्याचबरोबर त्यांच्यामध्ये असलेल्या अंधश्रध्देमुळेही त्यांना मोठे नुकसान होताना दिसते. त्यामुळे वरील बाबी लक्षात घेता या आंध आदिवासी महिलांच्या समस्यांचे अध्यन करणे गरजेचे असल्यामूळे प्रस्तुत विषयी संशोधनासाठी घेण्यात आला आहे.

६) संशोधनाची उद्दिष्टे :

१. आंध आदिवासी महिलांच्या सामाजिक — आर्थिक स्थितीचे अध्ययन स्थितीचे अध्यन करणे.

२. आंध आदिवासी महिलांच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.

३. आंध आदिवासी महिलांच्या आरोग्य विषयक स्थितीचे अध्ययन करणे.

४. आंध आदिवासी महिलांना जीवन जगताना जंगलात येणाऱ्या समस्येचे अध्ययन करणे.

५. आंध आदिवासी महिला आधुनिकीकरणाच्या झालेल्या बदलास कशा सामोरे जात आहेत याचे अध्ययन करणे.

७) संशोधनाची गृहितकृत्ये :

कोणत्याही विषयाचा अभ्यास करावयाचा असल्यास संशोधकाला प्रथम त्या विषयासंबंधी पूर्वज्ञान किंवा अनुभव असावा लागतो. हवा प्रारंभीक ज्ञानाच्या आधारे आपल्या विषयासंबंधी कोणतेही सामान्य अनुमान अथवा सिध्दांत मांडतो, त्यालाच गृहितके किंवा उपकल्पना म्हणतात. प्रस्तुत संशोधना करिता खालील गृहितकृत्याचा वापर करण्यात येणार आहे.

१. आंध आदिवासी महिलांचे सामाजिक व आर्थिक स्थान निम्न दर्जाचे आहे.

२. आंध आदिवासी महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.

३. आंध आदिवासी महिलांची आरोग्यविषयक स्थिती खालावलेली आहे.

४. आंध आदिवासी महिलांमध्ये अंधश्रध्दा आढळून येते व त्याचा त्याच्या जीवनावर विपरीत परिणाम होतो.

५. **आधुनिकीकरणामुळे आंध आदिवासी महिलांचे पारंपरिक व्यवसाय लोप पावले आहेत.**

८) समाजकार्य संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक पध्दतीने करण्यात येईल. या संशोधनामध्ये नांदेड जिल्हयातील आंध आदिवासी महिलांचा सामाजिक आर्थिक व आरोग्य विषयक स्थितीचा अभ्यास वर्णनात्मक पध्दतीने करण्यात येणार आहे. या संशोधनासाठी पुढील टप्यांचा अवलंब केला जाईल.

८.१ संशोधनाची क्षेत्रे :

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे नांदेड जिल्हा आहे. आंध आदिवासी महिलांच्या सामाजिक, आर्थिक व आरोग्य विषयक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी नांदेड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. या जिल्हयामध् ये हदगाव, माहूर, हिमायतनगर, अर्धापुर, भोकर, किनवट, मुदखेड या तालूक्यातील आंध आदिवासी महिला ह्या एकक म्हणून निवड करण्यात आली आहेत.

८.२ नमुना निवड :

नांदेड जिल्ह्यातील आंध आदिवासी महिलांचा सामाजिक आर्थिक व आरोग्य विषयक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी गैर संभाव्यता नमुना निवड पध्दतीमधील सहेतुक नमुना निवड पध्दतीचा वापर करुन संशोधन क्षेत्रातील एकूण सहा तालुक्यामधील महिलांच्या लोकसंख्येच्या एक टक्के या प्रमाणे एकूण महिलांची निवड करण्यात येईल.

९) तथ्य संकलन :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनसामुग्रीचा वापर करण्यात येणार आहे.

व्याख्या फेअर चाईल्ड यांच्या मते

‘‘तथ्य ही असे घटना आहे की, जिच्याद्वारे निरीक्षण आणि मापनाच्या विषयी बाबत सर्वामध्ये अधिक प्रमाणात सर्वानुमते आढळून येते.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक साधनसामुग्रीचा वापर करण्यात येणार असून त्यामध्ये प्राथमिक साधनामध्ये प्रश्नावली. मुलाखत. अनुसूची मुलाखत

आणि प्रत्यक्ष निरीक्षण इत्यादी साधनांचा वापर करण्यात येईल.

दूय्यम साधनसामुग्रीमध्ये पूर्वी संशोधन केलेली संशोधने प्रकाशित व अप्रकाशित केलेले अहवाल, मासिके, दैनिक पुस्तके, वर्तमानपत्रे व अप्रकाशित शासकीय रेकॉर्ड, दूर्मिळ प्रलेख, संशोधन व इतर आदिवासी विभागातून प्रकाशित होणारी माहिती इत्यादीचा संशोधनासाठी वापर करण्यात येणार आहे.

१०) तथ्य विश्लेषण व निर्वचन :

प्रस्तुत संशोधनात संकलीत तथ्याचे संख्यात्मक व गुणात्मक पध्दतीने विश्लेषण करण्यात आले आहे. संख्यात्मक विश्लेषणाकरिता केंद्रिय प्रवृत्तीचे मापके, टक्केवारी, सहसंबंध, सरासरी या तंत्राचा वापर करण्यात आलेला असून गुणात्मक तथ्य विश्लेषणाकरिता व्यक्ती अध्ययन करण्यात आलेले आहे.

११) संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

नांदेड जिल्हयातील आंध आदिवासी महिलाचे सामाजिक, आर्थिक, वैयक्तिक, कौटूबिक, अंधश्रध्दा इत्यादी समस्यांचे अध्ययन करण्यात येणार आहे. संशोधना करिता प्राथमिक व दूध्यम तथ्य संकलनाच्या साधनांचा वापर केला जाणार आहे आणि नांदेड जिल्ह्यातील विविध तालूक्यापुरता मर्यादित असून येथील आंध आदिवासी महिलांचा समावेश करण्यात येईल. जे या परिसरात रहातात. त्याच बरोबर सन ह्यञ्घ ते ह्यञ्ह्यञ या वर्षातील आदिवासी विभाग, सेवाभावी संस्था, प्रसार माध् यमातील सर्वेक्षण आधार मानले जाईल.

१२) गृहितकृत्याची पडताळणी :

गृहितकृत्याच्या पडताळणीकरिता संशोधनातील उपयुक्त स्वरुपाच्या पध्दतीची निवड करणे आवश्यक ठरते. ज्या पध्दतीद्वारे निश्चित केलेले गृहितकृत्य व प्रत्यक्ष स्थिती यांच्या परस्पर संबंधाचे मापन केले जाऊ शकते. गृहितकृत्याच्या पडताळणीकरिता संशोधकाला निरिक्षणाच्या माध्यमातून करावे लागते. निराकरणीय गृहितकृत्याच्या पडताळणीकरिता उपयुक्त सांख्यिकीय पध्दतीची निवड करुन गृहितकृ त्ये तात्पुरत्या स्वरुपात निश्चित केलेली असतात. त्यांची तपासणी माहितीचे विश्लेषण करुन काढलेल्या निष्कर्षाच्या संदर्भात करणे आवश्यक व महत्वाचे आहे. गृहितकृत्याचा खरे—खोटे पडताळून पाहण्यासाठी अमान्य गृहितकांपासून सुरुवात करावी लागते.

१३) प्रकरण नियोजन

प्रस्तुत संशोधनाची मांडणी करण्यासाठी संशोधनाचे सात प्रकरणामध्ये विभागणी करण्यात येईल, ते खालील प्रमाणे.

प्रकरण पहिले : आंध आदिवासी समुदायाची ओळख

प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : संशोधन पध्दती

प्रकरण चौथे : आंध आदिवासी महिलांची सामाजिक आर्थिक स्थिती

प्रकरण पाचवे : आंध आदिवासी महिलांचे शैक्षणिक व आरोग्यविषयक स्थिती

प्रकरण सहावे : आंध आदिवासी महिलांना जीवन जगत असताना येणाऱ्या समस्यांचे विश्लेषण

प्रकरण सातवे : समाजकार्याचे प्रारूप व सुचना, निष्कर्ष, सारांश व गृहितकृत्याची पडताळणी

संदर्भग्रंथ सूची :

१. फडके सुधिर (१९६३) ''महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे प्रश्न'' जोशी आणि लोखंडे, प्रकाशन पुणे

२. कर्वे ची .ग. ''महाराष्ट्रातील आदिवासी लोकसाहित्य'' महाराष्ट्र लोकसाहित्य समिती, पुणे

३. गोडगोडे गुरुनाथ ''भारतीय आदिवासी'' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

४. देवगावकर एस.जी. (२००९) ''महाराष्ट्रातील निवडक जाती जमाती'' श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर

५. देशमुख ''आदिवासी समाजाचे दारिद्र्य'' निर्मल प्रकाशन, नांदेड

६. मुळे सुमन (१९९१) ''आदिवासी स्त्री जीवन'' सुगावा प्रकाशन, मुंबई

७. कुलकर्णी शौनक ''महाराष्ट्रातील आदिवासी'' डायमंड पब्लिकेशन, पुणे

८. गारे गोविंद ''महाराष्ट्रातील आदिवासी जमाती'' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

९. धुमाळे विश्वनाथ (२०१६) ''आंध आदिवासी जमात इतिहास व सांकृतिक वारसा'' सुवर्ण प्रकाशन

१०. बोरुडे रा.र. (२०१०) ''संशोधन पध्दतीशास्त्र'' विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे

११. संत दु. का. (२०१०) ''संशोधन पध्दती प्रक्रिया अंतरंग'' पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन, पुणे
१२. आखरे बी.एन. (२०१४) ''आदिवासींची ओळख'' पिंपळापुरे बुक डिस्ट्रिबुटर, नागपुर
१३. आगलावे प्रदिप (२०१०) ''संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे'' श्री प्रमोद मुंजे विद्या प्रकाशन, नागपुर
१४. घायाळ एस. पी. (२०११) ''आदिवासी समाजाचे समाजशास्त्र'' अरुणा प्रकाशन.
१५. वैद्य एन. बी. (२००७) ''संशोधन कार्याचा परिचय'' श्री मंगेश प्रकाशन, रामदासपेठ नागपूर.
१६. खैरनार दिलीप (२००९) ''प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी'' प्रकाशन डायमंड पब्लिकेशन्स.

संशोधक विद्यार्थी
मनोहर शामराव वागतकर

मार्गदर्शक
डॉ. ए. एन. कर्डीले
सहा. प्राध्यापक
जवाहरलाल नेहरु समाजकार्य
महाविद्यालय व संशोधन केंद्र, नांदेड